# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 15/01/2022 (शनिवार)
(सकाळ)

---

### अवैधरीत्या दारु बाळगणाऱ्या आरोपीवर कार्यवाही
### स्थानिक गुन्हे शाखेची धाड

दिनांक 14/01/2022 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक उपविभाग सावनेर हद्दीत पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, पोस्टे खापा हद्दीत शांताराम जनबंधु, रा. वाकोडी ता. सावनेर हा राहते घरी देशी दारु तसेच मोहाफुल गावठी दारु बाळगुन विक्री करीत आहे. अश्या मिळालेल्या माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सापळा रचून आरोपी नामे- शांताराम रामचंद्र जनबंधु, वय 62 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, वाकोडी, ता. सावनेर याच्या घरी दारु बाबत घरझडती घेतली असता त्याचे घरी अवैधरीत्या विनापरवाना देशी दारु चे 69 निपा कि. 6,900/-रु., 100 लिटार मोहाफुल गावठी दारु कि. 10,000/-रु., विदेशी दारू कि. एकुण 120 नग कि. 9,600/-रू. असा एकुण कि. 26,500/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूध्द पो.स्टे खापा येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पो.स्टे खापा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोहवा राजेंद्र रेवतकर, पोना आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर